# क्रीडा सुविधा खुल्या करण्याचा निर्णय



कोल्हापूर, ता. २७ : केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोविड-१९ च्या निकष, नियमावलीच्या अधीन राहून शिवाजी विद्यापीठातील क्रीडा सुविधा विद्यापीठाच्या क्रीडापटूंना ओळखपत्र दाखवून सरावासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडील सुविधा कोविड-१९ च्या अनुषंगाने शासनामार्फत केलेल्या लॉकडाउनमुळे सरावासाठी बंद ठेवल्या होत्या; मात्र सध्या सर्वत्र टप्प्याने अनलॉकची प्रक्रिया सुरू आहे. विद्यापीठाच्या क्रीडापटूंकडून होत असलेल्या मागणीचा विचार करता विद्यापीठाच्या जिमसह क्रीडा सुविधा क्रीडापटूंसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतलेला आहे. कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी जारी केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील. सध्या एम.फील. आणि प्रि-पीएच.डी. कोर्स वर्कच्या परीक्षा सुरू आहेत. या परीक्षांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास त्यांना विद्यापीठामार्फत वसतीगृह नियमांचे पालन करून निवासाची सुविधाही देण्यात येणार असल्याचे डॉ. नांदवडेकर यांनी कळविले आहे.

# विद्यापीठातील क्रीडा सुविधा होणार खुल्या

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या कोविड-१९ च्या निकष, नियमावलीच्या अधीन राहून शिवाजी विद्यापीठातील क्रीडा सुविधा विद्यापीठाच्या क्रीडापटूंना ओळखपत्र दाखवून सरावासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे. डॉ. नांदवडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडील सुविधा कोविड-१९ महामारीच्या अनुषंगाने शासनामार्फत करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सरावासाठी बंद ठेवण्यात आलेल्या होत्या. क्रीडापटूंना ओळखपत्र दाखवल्यानंतरच या सुविधांचा लाभ घेता येईल, तसेच कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील. सध्या एम.फिल. व प्री पीएच.डी. कोर्स वर्कच्या परीक्षा सुरू आहेत. या परीक्षांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास त्यांना विद्यापीठामार्फत वसतिगृह नियमांचे पालन करून निवासाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी कळवले आहे.

# विद्यापीठातील क्रीडा सुविधा विद्यार्थ्यांसाठी होणार खुल्या

## प्रशासनाचा निर्णय; नियमांचे पालन आवश्यक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र व महाराष्ट्र सरकारचे कोव्हिड-१९ चे निकष, नियमावलीच्या अधीन राहून शिवाजी विद्यापीठातील क्रीडा सुविधा विद्यापीठाच्या क्रीडापटूंना ओळखपत्र दाखवून सरावासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडील सुविधा कोरोना लॉकडाऊनमुळे सरावासाठी बंद ठेवण्यात आल्या होत्या. परंतु, सध्या सर्वत्र टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया सुरू आहे. विद्यापीठाच्या क्रीडापटूंकडून होत असलेल्या मागणीचा विचार करता विद्यापीठाच्या जीमसह क्रीडा सुविधा क्रीडापटूंसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. क्रीडापटूंना ओळखपत्र दाखविल्यानंतरच सुविधांचा लाभ घेता येईल. कोव्हिड-१९ च्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील, असे कुलसचिवांनी कळविले आहे.

विद्यापीठाच्या वतीने सध्या एम.फील. व प्री-पीएच.डी. कोर्स वर्कच्या परीक्षा सुरू आहेत. परीक्षांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास त्यांना विद्यापीठामार्फत वसतिगृह नियमांचे पालन करून निवासाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.

# महाविद्यालये सुरू करण्याचा तूर्त विचार नाही : उदय सामंत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू झाले असले तरी महाविद्यालये व अभियांत्रिकी कॉलेज सुरू करण्याचा निर्णय अद्याप घेतलेला नाही, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी रविवारी कोल्हापुरात दिली.

कोल्हापूर दौऱ्यावर असताना शासकीय विश्रामगृह येथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. मंत्री सामंत म्हणाले, परदेशात कोरोनाचा नवीन विषाणू आला आहे. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन पान २ वर ▸

# महाविद्यालये सुरू करण्याचा तूर्त विचार नाही : उदय सामंत

(पान १ वरून) विभागाशी चर्चा करून सर्व जिल्ह्यांतील महाविद्यालयांची परिस्थिती काय आहे, वसतिगृह महाविद्यालयांच्या ताब्यात दिली आहेत का, याचा विचार केला जाईल. कोरोना लसीच्या उपलब्धतेनंतर आपत्ती व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रयत्न राहील. विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाची मागणी पूर्ण केली आहे. आश्वासित प्रगती योजनेबाबत शासन सकारात्मक असून त्याच्या बैठका सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाबाबत सुनावणी सुरू आहे. महाराष्ट्र शासन भक्कमपणे मराठा समाजाबरोबर आहे. 'ईडब्ल्यूएस'बाबतची भूमिका उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी मांडली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ओबीसी वाटा काढून इतरांना देणार नसल्याचे सभागृहात सांगितले आहे. आरक्षण मिळण्यासाठी राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात जोरदार लढणार आहे. सीमाभागात शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक संकुल उभारण्यात येणार आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

**राज्य विद्यापीठ कर्मचारी संघटनेला सल्ला**

सातव्या वेतन आयोगाची सर्व अकृषी विद्यापीठांना अंमलबजावणी करावी लागेल. संघटनांनी आंदोलन करण्यापेक्षा काय त्रुटी आहेत, हे सांगितले पाहिजे. त्या बाजूला करण्याचा प्रयत्न करू. परंतु बाहेर आंदोलन, चर्चा करून निरोप पाठवू नये, असा सल्ला सामंत यांनी दिला.

## उद्धव ठाकरे यांच्या आदेशानंतरच महापालिका निवडणुकीबाबत निर्णय

कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेची काय भूमिका असावी, याबाबत स्थानिक पातळीवरील नेत्यांशी चर्चा करणार आहे. याची माहिती शिवसेना पक्षप्रमुख व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिली जाईल. पक्षप्रमुखांच्या आदेशानंतरच महापालिका निवडणुकीत कसे उतरायचे हे स्पष्ट होईल, असे मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

# एम.फिल.,पीएच. डी. कोर्सवर्क परीक्षार्थींना राहण्याची सुविधा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने एम.फिल.,पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षेसाठी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांकरिता मागणीनुसार राहण्याची व्यवस्था केली आहे. एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षेसाठीच्या ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीत विद्यापीठ परिसरात राहण्याची व्यवस्था उपलब्ध करून हवी आहे, अशा विद्यार्थ्यांकरिता मागणीनुसार राहण्याची व्यवस्था उपलब्ध केली जाईल. याकरिता विद्यार्थ्यांनी संबंधित अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग यांच्यामार्फत अर्ज सादर करावेत. त्याचप्रमाणे कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर कोरोना विषाणू याचा संसर्ग होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना, निकष पाळणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

# शिवाजी विद्यापीठातील क्रीडा सुविधा आजपासून खुल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील क्रीडा सुविधा आज, सोमवारपासून विद्यापीठाच्या क्रीडापटू, खेळाडूंसाठी खुल्या केल्या जाणार आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्गमित केलेल्या निकष, नियमावलीच्या अधीन राहून विद्यापीठ प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

सरावासाठी या सुविधांचा वापर करण्यापूर्वी खेळाडूंनी ओळखपत्र दाखविणे बंधनकारक राहणार आहे. विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडील सुविधा कोविड-१९ महामारीच्या अनुषंगाने लॉकडाऊनमुळे सरावासाठी बंद ठेवण्यात आलेल्या होत्या. मात्र, सध्या सर्वत्र टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया सुरू आहे. कोरोनाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# परीक्षार्थींची राहण्याची व्यवस्था

कोल्हापूर : एम.फिल., पीएच.डी.च्या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. त्यातील ज्या विद्यार्थ्यांना परिक्षेवेळी विद्यापीठात राहावयाचे आहे. त्यांना मागणीनुसार ती व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.